परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे



बीड जिल्ह्यातील एकमेव विश्वासार्ह बातम्यांचे दैनिक
परळी संघर्षनेता

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 218 | गुरुवार दि. 10 सप्टेंबर 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# ना. पंकजाताई मुंडे यांची अभिनव संकल्पना ;

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी राज्यात प्रथमच भव्य 'महा गणेश मूर्ती कार्यशाळा

➩ नवी मुंबईत सात हजाराहून अधिक शालेय विद्यार्थी व नागरिक होणार सहभागी



मुंबई, दि. 9 : पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश व्यापक प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या अभिनव संकल्पनेतून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे उद्या 10 सप्टेंबर रोजी नवी मुंबई येथे 'पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळा 2026' आयोजित करण्यात आली आहे. साडेपाच ते सहा हजार शालेय विद्यार्थी आणि नागरिक एकाच वेळी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करणार असून, राज्यातील हा अशा स्वरुपाचा पहिलाच उपक्रम असणार आहे.

ही कार्यशाळा 10 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळेत सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते कार्यशाळेचा शुभारंभ होईल. मूर्तिकारांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी विद्यार्थी आणि नागरिक पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारणार आहेत. वर्षभरातील सर्व सण व उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे व्हावेत, यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे गेल्या दोन दशकांपासून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला चालना देण्यासाठी विविध स्पर्धा आणि उपक्रमही राबविले जात आहेत.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार शुभारंभ

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील प्रमुख उत्सव आहे. गणरायाची पूजा म्हणजे निसर्गाचीच पूजा मानली जाते. गणेशपूजेत विविध वृक्षांची पाने अर्पण करण्याची परंपरा आहे. पूर्वी लाल किंवा शाडूच्या मातीच्या पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर होत असे. मात्र, कालांतराने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती आणि रासायनिक रंगांचा वापर वाढल्यामुळे विसर्जनानंतर पाण्याचे प्रदूषण होते. पाण्यात शिसे, अॅल्युमिनियमसारखे जड धातू मिसळल्याने जलचरांनाही धोका पान 3 वर

# आजपासून मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात शिबिर ; शून्य प्रलंबित्व करण्याचे आदेश

» मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड यांचा आठही जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद




छत्रपती संभाजीनगर, दि. 8 (विमाका) : मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये जात प्रमाण पत्राच्या वाटपात शून्य प्रलंबित्व ( झिरो पेडन्सी) ठेवण्यासाठी प्रशासनाने आज मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील प्रांत अधिकारी आणि जात पडताळणी अधिकाऱ्यांसोबत अडीच तास सविस्तर बैठक घेतली. 10 सप्टेंबर पासून संपूर्ण मराठवाड्यात 8 जिल्ह्यात शिबिर आयोजित करण्यात आले असून एकही प्राप्त अर्ज निर्णयाविना शिल्लक राहणार नाही,असे उद्दिष्ट देण्यात आले.

जात प्रमाणपत्र वाटपासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर प्रयत्न सुरु केले असून आज आठही जिल्हाधिकारी यांच्या पान 3 वर

# आज ठळक

## ते माझे भाऊ अमृता फडणवीसांचं जरांगें पाटलांना जेवणाचं निमंत्रण



नागपूर : राज्यामध्ये मराठा आरक्षण प्रश्नावरुन मोठा गदारोळ सुरु आहे. मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या 12 दिवसांपासून अंतरवाली सराटीमध्ये पुन्हा उपोषणाचं हत्यार उपसलं आहे. कुणबी प्रमाणपत्र मिळण्यामध्ये मराठा समाजाला अडचणी येत असल्याचं म्हणत जरांगे उपोषणावर ठाम आहेत. त्यांनी सरकारच्या शिष्टमंडळांशी चर्चा केली पण जोपर्यंत कायमचा तोडगा निघत नाही तोपर्यंत आपण उपोषण सोडणार नाही, असा पवित्रा जरांगेंनी घेतला आहे. यावेळी त्यांनी अनेकदा फडणवीस सरकारवर टीका केलेली पाहायला मिळाली पण आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी जरांगे पाटील यांना जेवणाचं निमंत्रण दिलं आहे. त्या म्हणाल्या की "मनोज जरांगे पाटील हे माझे भाऊ आहेत आणि मी त्यांना घरी जेवायला यायचं निमंत्रण देते." त्या नागपूरमध्ये बोलत होत्या.दुसरीकडे जरांगे उपोषणावर ठाम असून सरकारकडून कायमस्वरुपी तोडगा निघेपर्यंत माघार घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळे अमृता फडणवीसांच्या या निमंत्रणावर जरांगे काय प्रतिक्रिया देतात, याकडे लक्ष लागलं आहे. सध्या जरांगेंचं उपोषण 12 व्या दिवशीही सुरुच आहे. यावेळी सातत्याने होणाऱ्या ट्रोलिंगवर म्हणाल्या की, "मंत्र्याची बायको सगळ्यात जास्त ट्रोल होते. त्याची उपाधी मला दिली गेली आहे. आपल्या धर्मात वेगवेगळे रंग आहे. जगात सगळ्यात जास्त ख्रिश्चन धर्माला मानलं जातं. ते लोक सर्व धर्माच्या लोकांचा समावेश आपल्या उत्सवात करतात. नवीन वर्षाचे ख्रिसमस असो त्यांनी लोकांना सेलिब्रेट पान 3 वर

# राज्यात 15 ऑक्टोबरपासून ऊस गाळप हंगामाला सुरुवात, मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय




ऊस गाळप हंगामाचे सन 2026-27 बाबत धोरण निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्री समितीची बैठक झाली. या बैठकीत यंदाचा ऊस गाळप हंगाम 15 ऑक्टोबर 2026 पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, साखर आयुक्त डॉ. संजय पान 3 वर

# तर जशास तसे उत्तर देणार, मनोज जरांगे पाटलांचा सरकारला इशारा



अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचं मराठा आरक्षणासाठी उपोषण सुरु आहे. या उपोषणाचा 12 वा दिवस असून मनोज जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकार, मंत्री आणि सत्ताधारी आमदारांवर अत्यंत कडक शब्दांत तोफ डागली आहे. शासकीय बैठकीचा आणि सरकारमधील काही मंत्र्यांच्या भूमिकेचा समाचार घेताना, "मराठा आंदोलन मोडीत काढण्याचे षडयंत्र रचले जात आहे," असा थेट आरोप जरांगे यांनी केला आहे. तुम्ही सपशेल हरले आहात. तुम्ही हार मानायला पाहीजे असंही त्यांनी यावेळी सांगितलं. जरांगे यांनी पुढे सांगितलं की, "मी कोणाचेही ऐकत नाही, पण केवळ लाड आणि सामंत यांच्या शब्दावर विश्वास ठेवून मी सलाईन घेतली होती, त्यांचा शब्द न् शब्द ऐकला होता. पण आता मराठा आंदोलन मोडीत काढण्यासाठी अंतर्गत कट कारस्थानं सुरु आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर थेट हल्ला चढवत जरांगे पाटील म्हणाले की, एकनाथ पान 3 वर

# सामाजिक बांधिलकी जोपास्त समाजउपयोगी उपक्रम राबवून

## भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांचा वाढदिवस साजरा करणार -केशव गित्ते



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)- भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांचा वाढदिवस प्रति वर्षाप्रमाणे सामाजिक बांधिलकी जोपास्त विविध समाज उपयोगी उपक्रम राबवून साजरा करण्यात येणार आहे अशी माहिती राजेश गित्ते मित्र मंडळाचे अध्यक्ष केशव गित्ते यांनी दिली.

*राजेश गित्ते यांच्या वाढदिवसा चे औचित्य साधून प्रभु वैद्यनाथास रुद्र अभिषेक, निराधारांना फळ वाटप, वृक्षारोपण, जिल्हा परिषद शाळेतील मुलांना पाणी पिण्यासाठी जार,शैक्षणिक साहित्य, गो शाळेत चारा वाटप* असे विविध समाज उपयोगी उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

दिनांक 11 सप्टेंबर 2026 शुक्रवार रोजी सकाळी 07 वाजता रुद्र अभिषेक, 09 वाजता निराधारांना फळ वाटप, सकाळी 11वाजता जिल्हा परिषद पान 3 वर

# राष्ट्रीय स्तरावर सन्मान, महाराष्ट्रात मात्र प्रतीक्षा! शिक्षक पुरस्कार सलग दुसऱ्या वर्षी लांबणीवर



राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार नुकतेच शिक्षक दिनी प्रदान करण्यात आले. पण, महाराष्ट्रातील गुणवंत शिक्षकांसाठी दिला जाणारा 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार' या वर्षीही लांबणीवर पडला आहे. सलग दुसऱ्या वर्षी शिक्षकदिनी (5 सप्टेंबर) राज्यातील शिक्षकांचा सन्मान न झाल्याने राज्य सरकारच्या 'लेटलतीफ' कारभारावर टीका होत आहे.पारंपारिक स्वरुप: दरवर्षी 5 सप्टेंबर रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कारांचे वितरण केले जाते. महाराष्ट्रात 1962-63 पासून ही योजना सुरु आहे.पुरस्कारांची विभागणी: यामध्ये 38 प्राथमिक, 39 माध्यमिक, 2 विशेष शिक्षक, 19 आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक शिक्षक, 8 सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका आणि प्रत्येकी 1 दिव्यांग व स्काऊट-गाइड शिक्षक अशा विविध प्रवर्गांत हे पुरस्कार दिले जातात. वर्तमान चित्र: राष्ट्रीय पातळीवर 5 सप्टेंबरला शिक्षकांचा गौरव झाला; मात्र महाराष्ट्रातील राज्य शिक्षक पुरस्कारांची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचलेली नसल्यामुळे राज्यातील शिक्षक सन्मानापासून वंचित राहिले पान 3 वर

# अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या परळी युवक तालुकाध्यक्ष पदी शाम मुंडे यांची निवड



परळी/प्रतिनिधी

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या परळी युवक तालुकाध्यक्ष पदी कन्हेरवाडी येथील शाम मुंडे यांची निवड करण्यात आली आहे. आज केज येथे झालेल्या संघटन सृजन अभियान अंतर्गत एका कार्यक्रमात त्यांची निवड करण्यात आली. काँग्रेस नेत्या माजी खासदार रजनीताई पाटील, पक्षाचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस आदित्य दादा पाटील, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांना आगामी राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी परळीचे तालुकाध्यक्ष अॅड. प्रकाश मुंडे उपस्थित होते.

याप्रसंगी आभार प्रदर्शन करताना नूतन तालुकाध्यक्ष शाम मुंडे म्हणाले की, आपण गेल्या बऱ्याच कालावधीपासून परळी विधानसभा मतदारसंघातील वंचित, दुर्बल घटकांच्या न्याय हक्कासाठी लढा देत असून, पक्षश्रेष्ठींमार्फत मोठी जबाबदारी आपल्यावर टाकल्याने पान 3 वर

# दुष्काळजन्य परिस्थिती आणि मर्यादित पाणीसाठा : तातडीने उपाययोजना गरजेची - नगराध्यक्षा पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी

- नागापूर वाण प्रकल्पातील अनधिकृत पाणी उपसा तात्काळ बंद करा; परळी वैजनाथ नगरपरिषदेची तहसीलदारांकडे मागणी



परळी वैजनाथ : प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नागापूर येथील वाण प्रकल्पातून सुरु असलेला अनधिकृत पाणी उपसा तात्काळ बंद करून संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी परळी वैजनाथ नगरपरिषदेने तहसीलदारांकडे केली आहे. दुष्काळजन्य परिस्थिती आणि प्रकल्पातील मर्यादित पाणीसाठा यामुळे पाणीसाठा संरक्षित करण्यासाठी तातडीने उपाययोजना गरजेची असल्याची मागणी नगराध्यक्षा पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व पदाधिकाऱ्यांनी यावेळी केली. पान 3 वर

# परळी न. प.च्या पुनर्नियुक्त मुख्याधिकाऱ्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते वैजनाथ सोळंके व पदाधिकाऱ्यांनी केले स्वागत



परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - परळी वैद्यनाथ नगर परिषदेच्या मुख्याधिकारी पदी त्र्यंबक कांबळे यांची पुनर्नियुक्ती राज्य शासनाने केली असून यासाठी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेतला होता. श्री कांबळे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने नगर परिषदेचे गटनेते वैजनाथराव सोळंके व बहुतांश पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आज स्वागत केले. परळी वैद्यनाथ शहरातील प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास 301 कोटी रुपयांची मान्यता राज्य सरकारने दिली असून त्याअंतर्गत मंदिर व परिसरात विविध विकास कामे सुरु आहेत. त्र्यंबक कांबळे यांच्या कार्यकाळात यापैकी पान 3 वर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ.
आजीवन शिक्षण व विस्तार विभाग
स्वयंनिर्वाही प्रमाणपत्र कोर्स
उपलब्ध कोर्सेस
- Certificate Course in Librarianship
- Certificate Course in Professional Sales Marketing Executive (PSME)
- Certificate Course in English Fluency Interview Techniques & Soft Skills
- सौंदर्य संवर्धन व व्यक्तिमत्व विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- ड्रेस मेकिंग अँड डिझायनिंग अभ्यासक्रम
- Bank Pro 360 Certificate Course in Banking, Finance and Co-Operative Banking
बँकिंग क्षेत्रातील सर्वोच्च माहिती | वित्तीय सेवा व व्यवस्थापन कौशल्ये
सरकारी बँकांची व्यावहारिक माहिती | करिअरसाठी उपयुक्त कोर्स
कालावधी 6 महिने | प्रवेश क्षमता 50
समन्वयक प्रा. डॉ. राजकुमार यल्लावाड 9881294 195 | सहसमन्वयक प्रा. डॉ. राजश्री कुल्माणकर 7709705454
प्राचार्य डॉ. विद्या देशपांडे
|| शिक्षण • संस्कार • स्वावलंबन ||

*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक*
*शैक्षणिक वर्ष २०२६-२७*
प्रवेशाची मुदत वाढली!
बी.ए. (B.A.) आणि बी.कॉम. (B.Com.)
प्रवेश मर्यादित. त्वरा करा.
अभ्यास केंद्र: 2218A कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय. परळी वैजनाथ.
सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना सुवर्णसंधी! त्वरा करा! मर्यादित जागा उपलब्ध.

वेळ: सकाळी १०:०० ते दुपारी ४:००
संपर्क प्रा. डॉ. शिवनारायण बाघमारे मोबाईल 9890206196
तुमच्या उज्वल भविष्यासाठी आजच पाऊल उचला!

# अगदीच 'बाल' भारती!

स्वत:विषयी न्यूनगंड असलेल्या व्यक्ती आणि अशा व्यक्तींचा समाज भविष्यापेक्षा इतिहासात रममाण होण्यात धन्यता मानत असतो. अशा न्यूनगंडीयांसाठी इतिहास हा नेहमीच उदात्त, अनुकरणीय, घरांवर सोन्याची कौले वाहणारा असतो. बरे, शहाण्यांची पंचाईत अशी की ना भविष्य नाकारता येते ना इतिहास. त्यामुळे या अशा इतिहासात रमलेल्यांचे वर्तमानात करायचे काय, हा प्रश्न. महाराष्ट्र सरकारच्या 'बालभारती'ने इयत्ता सहावीच्या इतिहासात जे काही गुण उधळले आहेत ते पाहिल्यावर हा प्रश्न पुन्हा समोर ठाकतो. " वेदकाळातील लोकांचा आहार हा वनस्पती-जन्य (प्लँट बेस्ड) पदार्थांचा होता" आणि समाजातील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी वर्ण व्यवस्था त्या त्या व्यक्तीच्या उपजीविकेच्या साधनांवरून तयार झाली, या चारही वर्णांतील नागरिकांचे एकमेकांशी 'प्रेमाचे, सौहार्दाचे आणि सहकार्याचे' संबंध होते, असे हे इतिहासाचे पुस्तक सांगते. 'द इंडियन एक्स्प्रेस'च्या मूळ वृत्तातील दोन विधानांचा सोपा अर्थ असा की पुराण-कालात भारतीय हे मुख्यत्वे शाकाहारी होते आणि विविध जाती या जन्माच्या आधारे नव्हे; तर त्या त्या व्यक्तीच्या जगण्याच्या साधनांमुळे तयार झाल्या. म्हणजे जातिव्यवस्था अशी आपल्याकडे नव्हतीच, असे बालभारती म्हणते. इतिहास नव्याने लिहिणे याचा अर्थ इतिहास नव्याने तयार करणे नव्हे, याची जाणीव 'बालभारती'चे हे पुस्तक तयार करणाऱ्या विद्वानांस नसावी असे दिसते.

'बालभारती'चे मुख्यालय पुण्यात आहे. पुण्यातच मुख्यालय असलेल्या काही प्रकाशकांनी वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत इत्यादी मूळ संस्कृतातील ग्रंथांचे सुभग मराठीत अनुवाद प्रकाशित केलेले आहेत. हे मराठीत आहेत ही बाब अशासाठी नमूद केली की 'बालभारती'च्या प्रवर्तकांस संस्कृतचा गंध नसेल तर निदान त्यांनी मराठी तरी वाचलेले असावे. त्याबाबतही त्यांची बोंबच दिसते. नपेक्षा वेदकालातील यज्ञांत कोणकोणत्या प्राण्यांचे बळी सहज दिले जात होते हे 'बालभारती'च्या इतिहासकारांस कळते. राजा-महाराजांत पूर्वी अश्वमेध यज्ञ सर्रास केला जात असे. या यज्ञातील घोड्याचे नंतर काय होत असे, याचीही माहिती या इतिहासकारांस असती. यज्ञाच्या सांगतेनंतरच्या प्रसादात अडीच-हात लांब केळीच्या पानांवर काय वाढले जात असे आणि कोण भुरके मार-मारून त्यावर आडवा हात मारत असे, याचा तपशील अनेक ग्ंरथांत आढळेल. यातील काहीही या नव-बाल-भारतीकारांनी वाचले नसावे. वेदिक काळात 'मधुपर्क' नावाच्या एका विधीद्वारे खाशा पाहुण्यांसाठी खासे खासे मिष्टान्न तयार केले जायचे. हा 'मधुपर्क' काय 'शिजवण्यासाठी' होता, तो कसा सिद्ध केला जात असे त्याच्या विधीचा तपशीलही पुराणात या 'बालभारती' इतिहासकारांस आढळेल. तो वाचल्यास या 'मधुपर्क' नामे प्रक्रियेत मुळा, शेपू, पालक, गवार वा भेंडी इत्यादी भाज्या वापरल्या जात होत्या किंवा काय, याची जाणीव त्यांस होईल आणि या इतिहासकार ब्रह्मवर्गाचे पोट ढवळून निघेल. कोणी महनीय व्यक्ती घरी भोजनास येणार असेल तर कालवडीचे कोवळे मांस यजमानांस शिजवावे लागे याचाही रास्त तपशील या 'बालभारती'कारांस आढळेल. मात्र वेदकाळी भोजनात धान्ये, दूध, दही, लोणी, मध इत्यादींचा सढळ वापर केला जाई, गहू, साळी, कडधान्ये इत्यादी वनस्पती-जन्य घटकांचा समावेश त्या काळी भोजनात असे, असे आपल्याच इतिहासाचा कसलाही गंध नसलेले हे 'बालभारती'कार सहावीच्या पुस्तकात लिहितात.असे लिहिणाऱ्या उच्चवर्णीय बालभारती-कारांस स्वत:च्या घरातील सोवळे-ओवळे पाळणाऱ्या आजीपलीकडे इतिहास ठाऊक नाही, याची खात्री इतरांस बाळगता यावी. हा असा खोटा इतिहास शिकवणाऱ्यांच्या मुळाशी आहे शाकाहारी-वर्चस्ववाद. या वर्चस्ववादाची लागण अलीकडे फारच झपाट्याने होताना दिसते. त्यामागील कारणे सांगण्याची गरज नाही. पण मुदलात शाकाहारी वरिष्ठ आणि मांसाहार करणारे मात्र कनिष्ठ ही अढीच सडक्या वृत्तीची द्योतक. कोणी काय खावे अथवा खाऊ नये हा ज्याचा त्याचा प्रश्न. एखादी व्यक्ती काय खाते वा खात नाही यावरून तिचे कमी-जास्तपण ठरवले जाणार असेल तर भौतिक प्रगती साधणारे समस्त पाश्चात्त्य या मंडळींच्या मते हीन ठरायला हवेत. तसे असेल तर पाश्चात्त्य जगात प्रवेश मिळवण्याची आणि ग्रीनकार्डादी सुख-सोयींची आस या शाकाहारींनी बाळगू नये. इथे शाकाहाराचा उदोउदो करणारे संधी मिळाल्यावर नळ्या चोखण्यात कशी धन्यता मानतात हे नव्याने सांगण्याची गरज नाही. याची जाणीव या 'बाल -भारती'कारांस नाही. याचे कारण हा नवा इतिहास रचणाऱ्यांची उच्चवर्णी वृत्ती.

ती अंगी पुरेपूर मुरलेली असल्यामुळेच या देशातील जात-व्यवस्थेचा इतिहास नाकारण्याचे औद्धत्य हे 'बाल-भारती'कार दाखवतात. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र यांच्यातील संबंध सौहार्दाचे कधी होते? ते तसे होते तर शूद्रांस चालताना आपल्यामागे केरसुणी का लटकवावी लागत असे? जमिनीवर थुंकण्याचीही बंदी असलेल्यांस आपल्या गळ्यात थुंकण्याची मडकी का वागवावी लागत? शूद्राची सावली पडली की विटाळ झाला असे कोणत्या वर्गास वाटे? पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात कोणाला प्रवेश नव्हता आणि तो मिळावा यासाठी कोणास आंदोलन करावे लागले? या चारही वर्णातील संबंध समजा वेदकाळापुरतेच सलोख्याचे होते तर मग त्यांच्यात त्या काळी तरी रोटी-बेटी व्यवहारही होत असणार. त्याची रास्त माहितीही या नव-बालभारतीकारांनी द्यावी. हा वर्णविग्रह नव्हता तर शिक्षणासारखा अगदी प्राथमिक हक्क मागणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेणाचे गोळे फेकण्याचे शौर्यकृत्य कोणत्या वर्णातील महाजनांकडून केले गेले? या चारही वर्णांत सहकार्य होते असे ही नव-बालभारती म्हणते. तसे होते तर घोटभर पाण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांना सत्याग्रह का करावा लागला? उपजीविकेच्या साधनांवरून(च) जर वर्ण ठरत होते तर किती उच्चवर्णीयांनी मेलेल्या ढोरांची चामडी काढण्याची वगैरे कामे केली? उच्चवर्णीयाचे चिरंजीव कितीही 'ढ' असले तरी त्यास मिळणाऱ्या संधी आणि तथाकथित कनिष्ठ वर्गीयांतील गुणवानांसही न्याय्य हक्कासाठी करावा लागलेला संघर्ष यात काहीही अंतर नव्हते, असे या नव-बालभारतीकारांस वाटते काय? तसे असेल तर त्यांनी थेट तसे म्हणावे.

तसे करण्याची हिंमत या मंडळींच्या ठायी नाही. तशी ती असती तर उठणाऱ्या वादळाची पर्वा न करता हे नवबाल-भारतीकार आपले मूळ रंग दाखवते. पण तसे करणे राजकीयदृष्ट्याही परवडणारे नाही. म्हणून मग इतिहासच बदलायचा. इतिहासकालीन वास्तव गोरे-गोमटे दाखवायचे आणि ते तसेच होते याचा प्रसार करायचा; हा कावा. तो बाल-भारतीच्या पुस्तकातून करणारे आणि दक्षिण मुंबईत मांसाहारींस घर देणार नाही, अशी भूमिका घेणारे हे दोन्हीही एकाच 'जात'कुळीतले. त्यांस वेळीच रोखायला हवे. आपल्याकडे जशी जातव्यवस्था तसा अमेरिकादी देशांत वंशविद्वेष. उभयतांत फरक इतकाच की आपले सामाजिक वैगुण्य लपवण्याचा प्रयत्न त्या देशांत होत नाही. आपण मात्र जातव्यवस्थेचे कटू वास्तव दडवण्याचा प्रयत्न अजूनही करतो. आजार लपवला तर तो बळावतो. त्यापेक्षा त्याचे अस्तित्व मान्य करून निर्मूलनासाठी मोकळेपणाने त्यावर उपचार करणे इष्ट. हे इतके साधे तत्त्वही बाल-भारतीस माहीत नसावे? शक्यता ही की माहिती असूनही नव-सत्य रेटण्याचा प्रयत्न संबंधितांनी केला असावा. सत्य काहीही असो. संबंधित यंत्रणा अगदीच 'बाल'भारती ठरते.

# पंतप्रधान मोदींच्या डॉक्युमेंटरीवर बीबीसीविरोधात 10,000 कोटींचा दावा : न्यायालय की प्रसिद्धीचे व्यासपीठ?

**डॉ. भारत कऱ्हाड**



बीबीसीने जानेवारी 2023 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संबंधित इंडिया: द मोदी क्वेश्चन ही दोन भागांची डॉक्युमेंटरी प्रसारित केली आणि त्यानंतर भारतात मोठा राजकीय वाद निर्माण झाला. या डॉक्युमेंटरीच्या विरोधात गुजरातमधील 'जस्टिस ऑन ट्रायल' या संस्थेने दिल्ली उच्च न्यायालयात बीबीसीविरुद्ध ₹10,000 कोटींचा मानहानि दावा दाखल केला होता. संस्थेचा आरोप असा होता की डॉक्युमेंट्रीमुळे भारताची प्रतिष्ठा, भारतीय न्यायव्यवस्था, तत्कालीन गुजरात सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचला.

या प्रकरणातील विशेष बाब म्हणजे एवढ्या मोठ्या रकमेचा दावा करण्यात आला असला तरी न्यायालयाने बीबीसीला ₹10,000 कोटींची नुकसानभरपाई देण्याचा कोणताही आदेश दिलेला नाही. उलट, हे प्रकरण अंतिम सुनावणीपर्यंत पोहोचण्यापूर्वीच फिर्यादी संस्थेने मागे घेतले. 3 सप्टेंबर 2026 रोजी न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्यासमोर संस्थेच्या वकिलांनी दावा मागे घेण्याची परवानगी मागितली आणि त्याच कारणासाठी नव्याने दावा दाखल करण्याची मुभा मागितली. न्यायालयाने ती मागणी मान्य केली आणि विद्यमान प्रकरण 'मागे घेतल्यामुळे निकाली' काढले.

या प्रकरणाचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे न्यायालयाने डॉक्युमेंट्रीमधील आरोप सत्य आहेत की असत्य, ते मानहानिकारक आहेत की नाहीत, किंवा बीबीसीने कायदेशीरदृष्ट्या चूक केली आहे की नाही, यावर अंतिम निर्णय दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणाकडे बीबीसीचा विजय किंवा मोदींच्या बाजूचा विजय अशा कोणत्याही राजकीय चौकटीत पाहणे योग्य ठरणार नाही. न्यायालयीन दृष्टिकोनातून सध्या एवढेच निश्चित आहे की ₹10,000 कोटींचा दावा दाखल झाला आणि नंतर तो फिर्यादीने मागे घेतला.

या प्रकरणात आणखी एक महत्त्वाचा कायदेशीर प्रश्न उपस्थित झाला होता—हा दावा या स्वरूपात संबंधित संस्थेला दाखल करता येतो का, म्हणजेच त्याची 'मेंटेनेबिलिटी' काय आहे? 2024 मध्ये हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतरही प्रकरण पुढे नेण्यासाठी अनेक वेळा तहकुबी मागण्यात आल्याचे न्यायालयीन नोंदींवर आधारित वृत्तांतात नमूद आहे. एप्रिल 2026 मध्ये वारंवार तहकुबी मागितल्याबद्दल संस्थेवर ₹20,000 खर्चही लावण्यात आला होता.

इथेच या प्रकरणातून एक व्यापक प्रश्न पुढे येतो. न्यायालयात एखादा दावा दाखल करणे हा स्वतःमध्ये न्याय मिळाल्याचा पुरावा नाही. दाव्यामागे कायदेशीर अधिकार असणे, त्या अधिकाराला बाधा झाल्याचे दाखवणे आणि त्यासाठी आवश्यक पुरावे सादर करणे आवश्यक असते. विशेषतः मानहानिच्या प्रकरणात मानहानि नेमकी




कोणाची झाली आणि नुकसानभरपाई मागणाऱ्या दावेदाराचा त्या कथित मानहानिशी थेट कायदेशीर संबंध काय आहे, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

या प्रकरणात संस्थेने नुकसानभरपाई स्वतःच्या नावाने मागितली होती; मात्र दाव्यात पंतप्रधान, केंद्र सरकार, गुजरात सरकार आणि भारताच्या लोकांच्या प्रतिष्ठा व सद्भावनेला झालेल्या कथित नुकसानीचा उल्लेख करण्यात आला होता. त्यामुळे 'ज्याची प्रतिष्ठा बाधित झाली, त्याच्या वतीने दावा करणाऱ्या संस्थेला स्वतःच्या नावाने नुकसानभरपाई मागण्याचा कायदेशीर अधिकार कितपत आहे?' हा प्रश्न स्वाभाविकपणे महत्त्वाचा ठरतो. 2024 पासून न्यायालयात 'मेंटेनेबिलिटी'चा मुद्दा उपस्थित होणे याच संदर्भात लक्षवेधी आहे.

आजच्या माध्यमविश्वात मात्र न्यायालयीन प्रकरणाचे आणखी एक वेगळे रूप दिसते. एखाद्या अत्यंत चर्चेत असलेल्या राजकीय किंवा सामाजिक विषयावर मोठ्या रकमेचा दावा दाखल झाला की तो लगेच बातमी बनतो. ₹10,000 कोटींचा दावा हा निश्चितच लक्ष वेधून घेणारा आकडा आहे. त्यातून मोठी सार्वजनिक चर्चा निर्माण होऊ शकते. परंतु एखाद्याने केवळ प्रसिद्धीसाठीच दावा दाखल केला, असा निष्कर्ष पुराव्याशिवाय काढणे योग्य नाही. त्याऐवजी समाजाने अधिक महत्त्वाचा प्रश्न विचारला पाहिजे—दाव्याचा कायदेशीर आधार काय आहे, दावेदाराचा स्वतःचा हक्क काय आहे, प्रकरण न्यायालयात किती पुढे गेले आणि शेवटी न्यायालयाने काय ठरवले?

कारण 'केस दाखल झाली' आणि 'केस सिद्ध झाली' या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. त्याचप्रमाणे '₹10,000 कोटींची मागणी केली' आणि '₹10,000 कोटींची नुकसानभरपाई न्यायालयाने मंजूर केली' यामध्येही जमीन-अस्मानाचा फरक आहे.

या प्रकरणातून माध्यमांच्या जबाबदारीचाही मुद्दा समोर येतो. एखाद्या बातमीची मथळी 'बीबीसीविरुद्ध ₹10,000 कोटींचा दावा' अशी असणे स्वाभाविक आहे; परंतु त्यासोबत हा दावा कोणी केला, कोणत्या कारणासाठी केला, न्यायालयीन प्रक्रिया कुठपर्यंत पोहोचली आणि शेवटी त्या दाव्याचे काय झाले, हेही वाचकांना सांगणे आवश्यक आहे. विशेषतः दावा मागे घेतला असल्यास ती बाब तितक्याच स्पष्टपणे मांडली गेली पाहिजे. अन्यथा लोकांच्या मनात 'दावा दाखल झाला म्हणजे आरोप सिद्ध झाले' असा गैरसमज निर्माण होऊ शकतो.

न्यायालयात जाण्याचा अधिकार हा लोकशाहीचा महत्त्वाचा भाग आहे. माध्यमांच्या विरोधात, सरकारच्या विरोधात किंवा एखाद्या सार्वजनिक व्यक्तीच्या विरोधातही कायदेशीर कारवाई करता येते. परंतु न्यायालयीन प्रक्रिया ही गंभीर बाब आहे. ती केवळ एखाद्या विषयाला अधिक चर्चेत आणण्यासाठी वापरली जाऊ नये, अशी अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. त्याचवेळी, कोणत्याही दाव्यामागे प्रसिद्धीचा हेतू होता असे ठोस पुराव्याशिवाय ठरवणेही योग्य नाही.

म्हणूनच अशा प्रत्येक प्रकरणात आपण 'कोणाने केस केली?' एवढेच न विचारता 'कशासाठी केली?', 'कायदेशीर अधिकार कोणता?', 'पुरावे कोणते?', 'न्यायालयाने काय म्हटले?' आणि 'अखेर काय निष्पन्न झाले?' हे प्रश्न विचारले पाहिजेत.

न्यायालय हे प्रसिद्धीचे व्यासपीठ नाही; ते न्यायाचे व्यासपीठ आहे. बीबीसीच्या विरोधात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डॉक्युमेंटरीसंदर्भात दाखल झालेल्या ₹10,000 कोटींच्या या दाव्याने हा फरक पुन्हा एकदा स्पष्टपणे समोर आणला आहे. मोठा दावा म्हणजे मोठा पुरावा नव्हे, मोठी रक्कम म्हणजे मोठा न्याय नव्हे आणि केस दाखल झाली म्हणजे आरोप सिद्ध झाले असेही नव्हे. शेवटी महत्त्वाचे असते ते एकच—न्यायालयासमोर काय सिद्ध झाले?

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# श्रीधर फडके: ज्योतीने तेजाची आरती

## (9 सप्टेंबर: श्रीधर सुधीर फडके वाढदिवस.)

_आपल्याकडे अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्व आहेत आणि होऊन गेलीत. आज दि.9 सप्टेंबर, संगीतकार श्रीधर फडके यांचा जन्मदिन- वाढदिवस. श्रीधर फडके हे भारतातील श्रेष्ठ गायक आणि संगीतकार म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म मुंबईत 1950 मध्ये झाला. महान कलाकार सुधीर फडके यांचा मुलगा श्रीधर फडके होय. मुंबईत जन्मलेले श्रीधर फडके हे मराठी संगीत उद्योगात चार दशकांहून अधिक काळ एक प्रेरणाशक्ती म्हणून कार्यरत आहेत. मराठी चित्रपट आणि संगीतातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे आणि त्यांची प्रतिष्ठित गाणी सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या जवळची बनली आहेत._

श्रीधर फडके (सप्टेंबर 9, 1950 - हयात) महाराष्ट्रातील, भारतातील श्रेष्ठ संगीतकार व गायक आहेत. त्यांचा जन्म मुंबई येथे दि.9 सप्टेंबर 1950 रोजी झाला. ते विख्यात गायक व संगीतकार सुधीर फडके यांचे पुत्र आहेत. संगीतकार, गायक आणि निर्माता म्हणून फडके यांनी मराठी संगीत जगतात आपली प्रभावी छाप सोडली आहे. "मी शिवाजीराजे भोसले बोलतोय" आणि "राजा शिवछत्रपती" ही त्यांची गाणी मराठी अभिमान आणि संस्कृतीचे गीत बनली आहेत. त्याच्या संगीताने अनेक पिढ्या ओलांडल्या गेल्या आहेत. वडिलांच्या शास्त्रीय संगीतावरील प्रभाव असल्यामुळे श्रीधर फडके यांचा संगीतातील प्रवास तरुण वयात सुरु झाला. एकल संगीतकार म्हणून ठसा उमटवण्यापूर्वी त्यांनी कीबोर्ड प्लेअर आणि सहाय्यक संगीतकार म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. सन 1983 मध्ये "चिमणी पाखरं" या चित्रपटाने त्यांची प्रगती झाली आणि तेव्हापासून त्यांनी 100 हून अधिक मराठी चित्रपट आणि असंख्य अल्बमना संगीत दिले आहे. त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत, फडके यांना प्रतिष्ठित महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार आणि व्ही. शांताराम पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळून सन्मान मिळाला आहे. त्यांना खरे फळं हे चाहत्यांकडून मिळालेल्या प्रेमात, प्रतिसादात आणि कौतुकामध्ये आहे. जे त्याच्या संगीताची खरंच कदर करतात.

गीत रामायण आणि सुधीर फडके: श्री प्रभू रामचंद्रांचे चरित्र म्हणजे हिंदू संस्कृतीचा गौरवशाली इतिहास. सर्वश्रेष्ठ आदिकवी महर्षी वाल्मिकींनी चोवीस हजार श्लोकांचे रामायण लिहिले. भारतीयांच्या मनावर या रामायणाने हजारो वर्षे राज्य केलं आहे. संस्कृत मध्ये 94 रामायणे आहेत. मराठी, हिंदी, तामिळ, कानडी, तेलुगु, गुजराती, डोगरी, बंगाली, ओडिसी, असामी, फारसी, प्राकृत, अशा प्रादेशिक भाषेतून सुद्धा रामायण सर्व भाषिकांपर्यंत पोहोचले आहे. कवी मोरोपंतानी तर 108 रामायणे रचली. संत एकनाथ, श्री समर्थरामदास, अशा संत आणि अनेक साहित्यिकांनी रामायणाच्या माध्यमातून जनतेच्या मनाची जडण घडण केली आहे. जगाच्या इतर भाषांत सुद्धा इंग्लिश, जर्मन, इटालियन भाषेत रामायण आहे. इतके सगळे रामायणाचे अवतार. पण, गदिमांची रससिद्ध प्रज्ञा आणि बाबूजींची सांगीतिक प्रतिभा यांचा अजोड अविष्कार म्हणजे मराठी गीतरामायण. महर्षी वाल्मिकींच्या रामायण या महाकाव्याला सरस्वतीपुत्र ग.दि.माडगुळकर यांनी केवळ छपन्न गीतात समूर्त साकार केलं. लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेला हा एक मराठी विश्वातला चमत्कारच होता. पिढ्यान पिढ्या स्मरणात राहील अशी कलाकृती म्हणजे हे "गीत रामायण" या गीत रामायणाने मराठीला अजरामर केलंय, याचा आम्हा मराठी माणसांना अभिमान आहे. या गीत रामायणाने रसिक श्रोत्यांवर, अगदी सामान्यातल्या सामान्य माणसालाही वेड लावले. का नाही लावणार? एकतर ही रामायणातील गीते आपल्या बोली भाषेतली, नवरसांनी ओतप्रेत भरलेली, मधुर चालींची, कमालीची भावोत्कट. भारतीय जीवन मूल्यांची महती सांगणारी, मनुष्य जीवनातले आदर्श कसे असावेत याचा धडा देणारी, चांगले व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी प्रेरणा देणारी गीते. शिवाय बाबूजी म्हणजे सुधीर फडके यांच्या स्वर्गीय संगीत, सुरेल चाली आणि दैवी आवाजामुळे ही रामायणातली गाणी साक्षात रामकथेतील प्रसंग, पात्रे आणि घटनाक्रम यांचे मूर्तिमंत चित्र डोळ्यासमोर उभे करतात. कवीच्या शब्दातील भावना जशाच्या तशा रसिकांपर्यंत पोहोचवण्याच काम त्यांनी केलं आहे. सिद्धहस्त गदिमांच्या कवितेतील शब्दांचा भाव, कवीची भूमिका अत्यंत तन्मयतेने गाण्यातून सादर केली आहे. तरीही गदिमा आणि बाबूजी दोघेही याचे श्रेय घेत नाहीत.ते श्रद्धेने म्हणतात की,"गीतरामायण आम्ही केलेले नाही ते आमच्या हातून झाले आहे". नाहीतर संगीत क्षेत्रात आज असंख्य मोठमोठे कार्यक्रम होत आहेत. पण जोपर्यंत त्याची माध्यमातून प्रसिद्धी होत आहे तोपर्यंतच ते लक्षात राहतात. गीत रामायणाचे हेच वैशिष्ठ आहे, म्हणूनंच ते निर्मिती नंतर 60 वर्षांनी सुद्धा कोटी कोटी लोकांच्या मनात घर करून आहे, गदिमा याबद्दल त्यांच्या कवितेत म्हणतात- सीताकांत लाड. सीताकांत लाड गदिमा आणि बाबूजींचे जिवलग मित्र. गदिमा पुण्यात तर बाबुजी मुंबईत. एव्हाना दोघेही त्यांच्या चित्रपट व संगीत क्षेत्रात अत्यंत व्यस्त होते, तरीही हे काम त्यांनी अत्यंत श्रद्धेने, आनंदाने आणि श्रीरामाच्या प्रेमापोटी भारावून जाऊन केले. अडचणी तर सुरुवातीपासून होत्याच. गीत रामायणातल्या पहिल्याच गीताचा प्रसंग, ललिताताई फडके आणि आनंद माडगुळकर यांनी त्यांच्या आठवणीत सांगितला आहे. गदिमांनी रामायणाचे पाहिलेच गीत लिहिले आणि ते त्यांचे मित्र नेमीनाथ यांच्या बरोबर बाबुजींकडे पाठवून दिले. आकाशवाणीत ऐन ध्वनिमुद्रणाच्या वेळी बाबूजींना ते मिळेना, धावपळ आणि शोधाशोध झाली, इकडे गदिमा गीत पाठवून दिल्यावर आपले काम झाले म्हणून निवांत झोपले होते. सीताकांत लाड यांनी गदिमांना निरोप पाठून बोलावून घेतले. ते आल्यानंतर गीत हरवल्याचे कळताच भडकले. वातावरण निवल्यानंतर सिताकांतानी गदिमांना सांगितले उद्या प्रसारण आहे, तेव्हा गीत तर तुम्हाला लिहावेच लागेल आणि त्यांनी गदिमांना गीत लिहिण्यासाठी एका खोलीत बसवून बाहेरून कडी घातली. तर 10 ते 15 मिनिटातच गदिमांनी दार वाजविले. पहातात तर काय, नवं गीत लिहून सिताकांतांच्या हातात ठेवलं. हे नवं गीत पहिल्या हरवलेल्या गीतासारखच होतं. फक्त "ज्योतीने तेजाची आरती !" या शब्दांची भर त्यात पडली होती. हे होतं गीतरामायणातलं पहिलं गीत- "स्वये श्री राम प्रभू ऐकती, कुश लव रामायण गाती ! अशा प्रकारे गीतरामायणाचे दर आठवड्याला एक अशी 56 गाणी पुणे आकाशवाणी केंद्रावरुन वर्षभर प्रसारित झाली. ट्रांझिस्टर तर नव्हताच, रेडीओ ठराविक लोकांकडेच. त्यामुळे एकत्र रस्त्यावर जमून गीत रामायण ऐकले जायचे. ते सुरु होण्यापूर्वी लोक रेडिओला हार घालायचे, उदबत्ती ओवाळायचे, नमस्कार करायचे आणि भक्ती भावाने गीत रामायण ऐकायचे. ते संपल्यावर प्रसादही वाटायचे. इतकी प्रभू रामचंद्रांवर श्रद्धा. त्यानंतर मुंबई, नागपूर, इंदोर, भोपाळ, हैद्राबाद, दिल्ली आकाशवाणी केंद्रावरुन अनेक वेळा गीतरामायणाचं प्रसारण झालं. अजूनही होतंय. चैत्रात गुढीपाडवा ते रामनवमी या काळात तर गीतरामायण हमखास लागलेच पाहिजे. एव्हढंच काय गीतरामायणाच्या सर्व प्रथम प्रकाशित झालेल्या कॅसेट्स विकत घेवून घराघरातून त्याचा आस्वाद घेतला जाई. आज रामनवमी असली तर, सकाळपासूनच ही गीते रेडीओ, दूरदर्शनच्या विविध चॅनेल वरून प्रक्षेपित होतात. सुधीर फडके यांच्या सुस्वर कंठातून बाहेर पडलेले रामायण संपूर्ण महाराष्ट्राने सर्वेन्द्रियांचे कान करून ऐकले, अजूनही ऐकताहेत. यातील गीतांचे करुण रस, रौद्र रस, वीर रस, भयानक, अद्भुत अशा सगळ्या भावनांचे झपाटल्यासारखे सादरीकरण होत असे. आजही ही गाणी ऐकताना श्रोतागणही झपाटून जातो. बाबूजी या गीतातून आपल्यासमोर शोकविव्हल दशरथ, शंकाकुल सीता, चिडलेला लक्ष्मण, संतापी भरत, प्रत्यक्ष उभे करतात. या गीत रामायणाचे बाबुजींनी 1800 प्रयोग केले. याची आठ भारतीय भाषांत भाषांतरे झाली. पण विशेष म्हणजे हे भाषांतर जसेच्या तसे झाले आहे आणि ही गीतं बाबूजींच्या मूळ चालीवरच गायली जातात. बालगंधर्व आणि हिराबाई बडोदेकर हे बाबूजींचे गायनातले आदर्श होते. त्यांनी भावगीतं, भक्तीगीतं, लोकगीतं, लावणी, भारुड, चित्रपटसंगीत असे विविध प्रकार हाताळले. त्यांनी हिराबाई बडोदेकर, बालगंधर्व, पं.भीमसेन जोशी, लता मंगेशकर, आशा भोसले, माणिक वर्मा, मोहम्मद रफी, मन्ना डे अशा दिग्गज गायकांच्या स्वरांना साज चढविला आहे. हा माझा मार्ग एकला, लाखाची गोष्ट, प्रपंच, जगाच्या पाठीवर, मुंबईचा जावई, चंद्र होता साक्षीला, झाला महार पंढरीनाथ, वंदे मातरम असे मिळून 110 चित्रपटाना त्यांनी संगीत दिलंय. त्याला लोकांनी प्रचंड दाद दिली आहे. "ज्योती कलश छलके" आणि "खुश है जमाना आज पहली तारीख है", या संगीत दिलेल्या आणि दिसलीस तू फुलले ऋतू, तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे, अशी अनेक भावगीतं बाबूजींच्या सुमधुर आवाजामुळे अजरामर झाली आहेत. पण एकूण त्यांच्या कारकीर्दीचा मुकुटमणी म्हणजे आनंद सोहळा असलेले गीतरामायणच. पुण्याच्या नगर वाचन मंदिरात एकदा मृत्युंजयदिना निमित्त स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या हृद्य सत्कार समारंभात बाबुजींनी "सागरा प्राण तळमळला" हे गीत म्हटलं. कार्यक्रमानंतर सावरकर बाबूजींना म्हणाले, तू माझं हे गाणं दोन वेळा म्हटलंस, पण मला तुझं गीत रामायण ऐकायचं. मग लगेच रात्रीच्या सत्कार कार्यक्रमात बाबूजी गायले. "दैवजात दुःखे भरता, दोष ना कुणाचा, पराधीन आहे जगती, पुत्र मानवाचा" हे बाबुजींच्या आवाजातलं यमन कल्याण रागातलं गीत ऐकून सावरकरांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यानंतर ते गहिवरुन बाबूजींना म्हणाले, "कुणाचं अधिक कौतुक करु? तुझं कि माडगूळकराचं?" वैयक्तिक आयुष्यात बाबूजींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांची मूल्ये जपली. स्वातंत्र्यवीर सावरकर बाबूजींचे प्रेरणास्थान होते. वीर सावरकर हा सावरकरांच्या जीवनावरील चित्रपट बाबुजींनी अत्यंत निष्ठेने आणि कष्टाने बनवला. या चित्रपटाचा प्रवासही अत्यंत खडतर होता. सोपी गोष्ट नव्हती .पण बाबुजींनी "हा चित्रपट पूर्ण करेन मगच मरेन", ही त्यांची प्रतिज्ञा पूर्ण करून दाखवली. कलेबरोबरच त्यांच्यातील देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकी त्यांच्या आयुष्यातल्या अनेक घटनांवरुन दिसते. ते गोवा मुक्ती आंदोलनातले सशस्त्र क्रांतिकारक होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रचारक म्हणून जबाबदारीही त्यांनी पार पाडली होती. अमेरिकेत इंडिया हेरीटेज फौंडेशन स्थापन झाले ते बाबूजींच्या प्रेरणेमुळेच. संगीत क्षेत्रात कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांची झालेली मानहानी, सोसलेले अपार कष्ट, हाल, वाईट अनुभव घेवून सुद्धा नंतरच्या काळात मिळालेली अफाट लोकप्रियता, श्रोत्यांच्या हृदयात मिळवलेलं अढळ स्थान यामुळे त्यांचं जीवन कृतार्थ झालं असं वाटतं. असे हे जगाच्या पाठीवरचे रामभक्त आहेत. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!! वाढदिवसानिमित्त श्रीधर सुधीर फडके यांना सप्ताहभर निरामय जीवनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**राह. श्रीगुरुदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत नागरिकांमध्ये सातत्याने जनजागृती केली जात आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ‘मन की बात’मधून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. या मोहिमेला पुढे नेण्यासाठी एकाच ठिकाणी हजारो विद्यार्थी आणि नागरिकांना एकत्र आणून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक मूर्तींचा संदेश मोठ्या प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचेल, असा विश्वास मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.

कार्यशाळेस उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार मंदा म्हात्रे, आमदार निरंजन डावखरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ठाणे, पनवेल, खारघर, उलवे, मुंबई आणि नवी मुंबई परिसरातील शाळांमधील साडेपाच ते सहा हजार विद्यार्थी व नागरिक या कार्यशाळेत सहभागी होतील. या उपक्रमामुळे राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्था आणि शैक्षणिक संस्थांनाही अशा पद्धतीच्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असेही मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

-----------------------------------

उपस्थितीत प्रांताधिकारी आणि जात पडताळणी अधिकारी यांनाही बैठकीमध्ये समाविष्ट करण्यात आले होते.

मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगरच्या स्मार्ट सिटी कार्यालयात सकाळी 11 पासून अडीच तासाची मॅरेथॉन बैठक घेण्यात आली.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुलभता आणि गती आणावी. प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या कामाची अद्ययावत आकडेवारी दररोज प्रसारमाध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचवावी. तसेच नामंजूर अर्जांची कारणे स्पष्टपणे सार्वजनिक करावीत. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलदगतीने करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ वाढवून कार्यपद्धतीत सुधारणा कराव्यात, असे निर्देश उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी या बैठकीत दिले.या बैठकीला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील मुंबईतून सहभागी झाले होते.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीतील त्रुटी व अडचणींवर चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची बैठक स्मार्ट सिटी कार्यालयात झाली. या बैठकीला मुंबईहून दूरदृश्यप्रणालीद्वारे मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उप समितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. स्मार्ट सिटी कार्यालय येथे मराठी भाषा व उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, जालना जिल्हाधिकारी अशिमा मित्तल,बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जालना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. परभणी, नांदेड, लातूर धाराशीव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

कुणबी नोंदी नागरिकांना सहज उपलब्ध करा:

कुणबी नोंदींचे संगणकीकरण करुन गावनिहाय व मंडळनिहाय याद्या नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देण्याच्या कामाचा डॉ.विखे पाटील यांनी आढावा घेतला. जिल्ह्यांच्या अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या नोंदी नागरिकांना सहजपणे पाहता व शोधता याव्यात, यासाठी त्यांचे योग्य पद्धतीने प्रसिद्धीकरण करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

कुणबी नोंदी आढळलेल्या पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करता यावा, यासाठी जिल्हास्तरावर तसेच मंडळ स्तरावर 10 ते 17 सप्टेंबर या कालावधीत विशेष शिबिरे आयोजित करावीत. या शिबिरांच्या माध्यमातून गावागावांत जनजागृती करुन नागरिकांना अर्ज करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे व वंशावळीचे पुरावे याबाबत मार्गदर्शन करावे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यात नियुक्त केलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी या कामाचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

-----------------------------------

कोलते यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.राज्यातील ऊस उपलब्धता, गाळपाचे नियोजन, साखर उत्पादन, शेतकऱ्यांना मिळणारा ऊस दर तसेच साखर कारखान्यांसमोरील विविध आर्थिक व तांत्रिक बाबींचा बैठकीत सविस्तर आढावा घेऊन शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हिताचा समतोल साधून आगामी गाळप हंगामाचे नियोजन करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.2025-26 गाळप हंगामाचा आढावा, देशातील साखर साठा, थकीत एफआरपी व आरआरसी, सहवीज निर्मिती प्रकल्प, इथेनॉल पुरवठा, ऊस क्षेत्र व उत्पादन, साखर निर्मिती तसेच 2026-27 च्या गाळप हंगामाची पूर्वतयारी,हंगामनिहाय एफआरपी व एमएसपी, साखर उद्योगाशी संबंधित शासनाच्या विविध उपक्रमांसाठी कारखान्यांकडून करण्यात येणाऱ्या कपातीचे धोरण आणि गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण मंडळाच्या निधी कपातीचा आढावा,प्रलंबित देणी भागविण्यासाठी सॉफ्ट लोन योजनेवरील व्याज अनुदान सुरु करणे, ज्या साखर कारखान्यांचे सहवीज निर्मिती प्रकल्पांशी संबंधित वीज खरेदी करार संपुष्टात आले आहेत, अशा कारखान्यांना 2023-24 च्या हंगामाप्रमाणे प्रति युनिट 1.50 रुपये सबसिडी देणे, साखर पॅकिंगसाठी ज्युट बॅगची सक्तीची अट शिथिल करणे, सीबीजी निर्मिती प्रकल्पांना आर्थिक व तांत्रिक प्रोत्साहन देणे, ऊस उत्पादन वाढीसाठी विशेष ऊस विकास योजना, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी सुधारित ऊस वाण, रोपवाटिका, ऊस बेणे प्रक्रिया, ठिबक सिंचन, रासायनिक व सेंद्रिय खतांचा संतुलित वापर, आधुनिक ऊस लागवड पद्धती आणि यांत्रिकीकरण यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष ऊस विकास योजना लागू करण्याबाबत सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी बैठकीत सादरीकरण केले.साखर उद्योगासंदर्भातील केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या विषयांवरही बैठकीत चर्चा झाली. त्यामध्ये साखरेच्या किमान विक्री किंमतीत वाढ करणे, इथेनॉलच्या दरात वाढ करणे तसेच इथेनॉल प्रकल्पांना प्रलंबित व्याज अनुदान तातडीने उपलब्ध करून देणे, या मागण्यांसाठी केंद्र शासनाकडे शिफारस करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

----------------------------

शिंदे यांना राज्यात दंगल घडवायची आहे आणि जर तसे झाले, तर त्याला सर्वस्वी तेच जबाबदार राहतील. तुम्ही सर्व आमदार आणि मंत्री एका बाजूला झालात, तरी आमचे काहीही वाकडं करू शकत नाही. आमदार प्रताप सरनाईक यांच्यावरही जरांगे पाटील यांनी सडकून टीका केली. प्रताप सरनाईक मधेच आले आहेत. ते म्हणे एसटी भरुन लोक आणणार आहेत? ते येणार पण नाहीत आणि आले तर मराठे असे गोटे मारतील की पळता भुई थोडी होईल. आम्ही आता तुमचे वस्ताद होणार आहोत. तुमच्या नेत्याला आम्ही आधी 3 वर्षे गोड बोलत होतो, ते का सांगत नाही? असाही प्रश्नही त्यांनी या निमित्ताने विचारला. आरक्षण संपवायला निघालात पण ते कधीच संपणार नाही, असंही जरांगे पाटील पुढे म्हणाले.मराठा आरक्षणाचा प्रश्न मिटवण्यासाठी सरकारला अंतिम इशारा देत जरांगे पाटील म्हणाले की, 12 तारखेच्या आत प्रश्न सोडवा, नाहीतर मुंबईला जाणार म्हणजे जाणार! आमचा संयम सुटला की तुम्हाला आमची ताकद कळेल.

----------------------------

प्राथमिक शाळा बेलंबा येथे पाणी जार वाटप, वृक्षारोपण, शैक्षणिक साहित्य वाटप, दुपारी 01 वाजता गोशाळा येथे चारा वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन परळी वैजनाथ तालुका भाजपा पदाधिकारी आणि राजेश गिते मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

----------------------------------------

आहेत.तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकदिनीच शिक्षकांचा बहुमान न होणे ही अत्यंत शोकांतिका आहे, अशी खंत शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी व्यक्त केली आहे. शिक्षकदिनी मिळणाऱ्या पुरस्काराचे वेगळे महत्त्व असते, परंतु शासनाकडून अजूनही घोषणा झालेली नाही.

“एकीकडे राष्ट्रीय पुरस्कारांची तयारी पूर्ण झालेली असताना राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षकांना प्रतीक्षा करावी लागणे हे दुर्दैव आहे. याशिवाय 2018 पासून आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांची वेतनवाढ शासनाने बंद केली असून ती तात्काळ पूर्ववत करावी,” अशी मागणी राज्य शिक्षक परिषदेचे (प्राथमिक विभाग) प्रांत कार्यवाह पुरोषोत्तम काळे यांनी केली आहे.

--------------------------------------

नगरपरिषदेच्या वतीने आज 9 सप्टेंबर 2026 रोजी तहसीलदार, परळी वैजनाथ यांना याबाबत पत्र देण्यात आले आहे.नागापूर येथील वाण प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता 18 दशलक्ष घनमीटर (दलघमी) असून त्यापैकी परळी नगरपरिषद हद्दीतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी 5 दलघमी पाणी आरक्षित आहे. सध्याच्या परिस्थितीत प्रकल्पात केवळ 20 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दुष्काळजन्य परिस्थिती आणि मर्यादित पाणीसाठा लक्षात घेता उपलब्ध पाणी केवळ पिण्याच्या पाण्यासाठी राखून ठेवणे अत्यावश्यक आहे. मात्र, प्रकल्पातून सुरु असलेल्या अनधिकृत मोटारी तसेच ड्रिपद्वारे होणारा पाणी उपसा तात्काळ बंद करण्याची आवश्यकता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी मुद्देसूद व खंबीरपणाने विषय मांडत सर्वांच्या अत्यावश्यक असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या विषयावर सुद्धा प्रशासन गांभीर्याने घेत नसल्याबद्दल खडसावून जाब विचारल्याचे बघायला मिळाले. यावेळी त्यांनी सांगितले की, बीड जिल्हाधिकाऱ्यांनी अल निनो च्या पार्श्वभूमीवर दि. 12.06.2026 रोजीच आदेश काढला होता. या आदेशान्वये जिल्ह्यातील सर्व प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी पुढील आदेशापर्यंत आरक्षीत करण्यात आलेले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या पाटबंधारे प्रकल्पातील जलसाठ्याचा अनधिकृत वापर अथवा उपसा होत

नाही ना याची तपासणी करणे. नदी, नाला, तलाव, बंधारा व पाटबंधारे प्रकल्पातून तसेच पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातुन उपलब्ध पाण्याचा अनधिकृत पंप, मोटार, पाईपलाइन अथवा इतर साधनांद्वारे पाणी उपसा होत असल्याचे निदर्शनास आल्यास विद्युत पुरवठा खंडीत करून व सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधून सदर पथकाकडून संबधीताचे विरुध्द नियमानुसार तात्काळ प्रतिबंधात्मक / कायदेशीर कार्यवाही करणे असे स्पष्टपणाने आदेशित केलेले असतानाही परळीचे प्रशासन मात्र हे गांभीर्याने घेताना दिसत नसल्याचे त्यांनी नमूद केले. याबाबत नगर परिषदेने सर्व यंत्रणा उपलब्ध करून देऊनही आपण ती कारवाई केलेली नसल्याचे सांगून 24 तासात अनाधिकृत उपसा थांबवा अन्यथा आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याची वेळ येईल याची सर्वस्वी जबाबदारी तहसील प्रशासनाची राहील असा सज्जड इशाराही त्यांनी यावेळी दिला.

----------------------------------------

कामे सुरु करण्यात आलेली असून, त्याबाबत त्यांचा दांडगा अनुभव व कामातील बारकावे त्यांना माहीत असल्याने त्यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माथिकारी यांच्या नेतृत्वाखाली शहरातील विविध कामे मार्गी लावण्यात येतील.

त्याचबरोबर नगर परिषद प्रशासक काळात कोणताही निधी उपलब्ध नसताना श्री कांबळे यांनी कुशल प्रशासक, मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व म्हणून कार्यभार सांभाळून स्वच्छतेसह विविध कामे हाती घेतली होती, त्याही कामांना आता गती दिली.

दरम्यान नगर परिषदेतील गटनेते वैजनाथराव सोळंके यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक, पदाधिकारी यांच्या वतीने त्र्यंबक कांबळे यांचे आज स्वागत करण्यात आले असून यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी, राजा खान पठाण, अय्युब भाई पठाण, जयपाल लाहोटी, शकील कुरेशी, नगरसेवक अनंत इंगळे,ईस्माईल पटेल,दीपक मुंडे, रमेश पवार, पिंटू मुरकुटे, हाजी बाबा, भीमराव डावरे, सचिन सारडा, हसन भाईरवींद्र परदेशी, अजीज कच्छी, रमेश भोईटे, दत्ता सावंत, दीपक कुरिल आदी उपस्थित होते.

------------------------------

करायला लावले. त्याच पध्दतीने हिंदू धर्मात व्हावे. आपले सुद्धा दहीहंडी नवरात्र गरबा हे चांगले सण आहे. कोणी श्रद्धेने कोणत्याही जातीचा श्रद्धेने त्या ठिकाणी येत असेल आणि अडचणी निर्माण करत नसेल. कुटुंबासोबत विश्वासाचा टिळा लावून येत, असेल तर त्याला येऊ द्यावं.”

----------------------------------

जनसामान्यांच्या प्रश्नावर अधिक प्रभावीपणे काम करता येणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पक्षाने दिलेल्या जबाबदारीच्या माध्यमातून समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी आगामी काळात प्रयत्नशील राहून काँग्रेस पक्षाचे विचार तळागाळातील जनमानसापर्यंत पोहोचवणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. एका लढवय्या कार्यकर्त्याला काँग्रेस पक्षाने न्याय दिल्याची भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

## पान 4 वरुन

तोडगा काढावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. आरक्षणाच्या मागणीसाठी सुरु असलेल्या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही आंदोलकांकडून देण्यात आला.सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणलारस्ता रोको आंदोलनादरम्यान आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारच्या भूमिकेचा निषेध केला. मराठा समाजाला न्याय मिळालाच पाहिजे, आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावा, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता.

---------------------------------

शेतकरी बांधवांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी आणि धरती हिरवीगार व्हावी, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. पद्मावती गल्लीतील संभाजीनगर परिसरातील श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व नूतन मूर्तींची प्राणप्रतिष्ठा हा अत्यंत आनंदाचा आणि भक्तिमय प्रसंग आहे. धार्मिक स्थळांचे जतन व संवर्धन करण्यासोबतच परिसरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि सर्वांगीण विकासालाही प्राधान्य दिले जात आहे. नागरिकांच्या श्रद्धा, सहभाग आणि सहकार्याने साकारलेले हे श्री हनुमान मंदिर परिसराच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र बनेल. श्री हनुमानाच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख-शांती नांदावी आणि शेतकरी बांधवांना समाधानकारक पाऊस मिळावा, हीच प्रार्थना,” अशी प्रतिक्रिया नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी व्यक्त केलीपद्मावती गल्लीतील संभाजीनगर परिसरातील श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व नूतन मूर्तींची प्राणप्रतिष्ठा हा अत्यंत आनंदाचा आणि भक्तिमय क्षण आहे. नागरिकांच्या श्रद्धेतून साकारलेले हे मंदिर परिसरातील धार्मिक व सामाजिक एकतेचे केंद्र बनेल. श्री हनुमानाच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख-शांती नांदावी आणि शेतकरी बांधवांना समाधानकारक पाऊस मिळावा, अशी प्रार्थना आहे, अशी प्रतिक्रिया माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी यांनी व्यक्त केली. “पद्मावती गल्लीतील संभाजीनगर परिसरातील श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार करुन नूतन मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होत असल्याचा मनस्वी आनंद आहे. या मंदिराशी परिसरातील नागरिकांच्या श्रद्धा आणि भावना जोडलेल्या आहेत. नागरिकांच्या सहकार्याने मंदिर परिसरातील आवश्यक कामे पूर्ण करुन हा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावता आला, याचे समाधान आहे. यापुढेही परिसरातील मूलभूत सुविधा आणि सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू. श्री हनुमानाच्या कृपेने सर्व नागरिकांना सुख, शांती व समृद्धी लाभावी आणि शेतकरी बांधवांना समाधानकारक पाऊस मिळावा, हीच प्रार्थना,” अशी प्रतिक्रिया नगरसेवक सचिन सारडा यांनी व्यक्त केली.

“पद्मावती गल्लीतील संभाजीनगर परिसरातील श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व नूतन मूर्तींची प्राणप्रतिष्ठा हा सर्वांसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. या मंदिराशी नागरिकांच्या श्रद्धा आणि भावना जोडलेल्या आहेत. मंदिराच्या विकासासोबतच परिसरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा व विकासकामांना सातत्याने प्राधान्य दिले जाईल. या धार्मिक सोहळ्याला नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हीच या एकतेची खरी ताकद आहे. श्री हनुमानाच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, शांती व समृद्धी नांदो आणि बळीराजावर समाधानकारक पावसाची कृपा होवो, हीच मनोभावे प्रार्थना,” अशी प्रतिक्रिया नगरसेविका सौ. अश्विनी राहुल केंद्रे यांनी व्यक्त केली.

-------------------------------------------

जमा करावी आणि बैलपोळ्याच्या दिवशीच बळीराजाला आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी परळी वैजनाथ येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये पावसाने पाठ फिरवल्याने सोयाबीन, कापूस, तूर यांसह खरीप पिकांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी बँका तसेच खासगी सावकारांकडून कर्ज काढून पेरणी केली. मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न, घरचा प्रपंच आणि कर्जफेड या सगळ्या आशा याच पिकांवर होत्या. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत पिके करपून गेली असून, वर्षभराच्या मेहनतीची अक्षरशः राखरांगोळी झाली आहे.“शेतात पीक नाही, घरात पैसा नाही आणि दावणीला बांधलेल्या जनावरांसाठी चारा-पाणी नाही; मग बळीराजाने बैलपोळा साजरा तरी कसा करायचा?” असा संतप्त सवाल आज शेतकऱ्यांसमोर उभा आहे.एरवी बैलपोळ्याच्या काही दिवस आधी बाजारपेठा बैलांच्या मोरख्या, घुंगरमाळा, रंगरंगोटीचे साहित्य आणि विविध सजावटीच्या वस्तूंनी गजबजून जातात. मात्र यंदा अनेक ठिकाणी बाजारपेठांमध्ये शुकशुकाट दिसून येत आहे. खिशात पैसा नसल्याने बैलांना सजवायचे कसे आणि त्यांना पुरणपोळीचा घास भरवायचा कसा, या विवंचनेने शेतकरी हतबल झाला असल्याचेही ॲड. मनोज संकाये यांनी म्हटले आहे.मराठवाड्यावर पुन्हा एकदा भीषण दुष्काळाचे सावट निर्माण झाले असून, प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखणे गरजेचे आहे. जळालेल्या आणि हातातून गेलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, शेतकऱ्यांना हेक्टरी भरीव आर्थिक मदत जाहीर करावी, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी आणि उद्या 10 सप्टेंबर रोजी बैलपोळा सणाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीची मदत जमा करावी, अशी मागणी ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

बैल हा केवळ शेतकऱ्याच्या शेतीचा साथीदार नाही, तर बळीराजाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ज्या बैलाच्या बळावर शेतकरी वर्षभर शेतात राबतो, त्याच बैलाचा सण साजरा करण्यासाठी आज शेतकऱ्याच्या खिशात पैसे नसणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

सरकारने शेतकऱ्यांच्या संयमाची परीक्षा घेऊ नये. आता घोषणा नकोत, आश्वासने नकोत; शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्यक्ष मदत हवी! अशी ठाम भूमिका ॲड. मनोज संकाये यांनी मांडली आहे. बळीराजा जगला तरच शेती जगेल आणि शेती जगली तरच महाराष्ट्र जगेल. त्यामुळे सरकारने तातडीने निर्णय घेऊन संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

---------------------------------------------

मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, उपमहापौर गणेश देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्यासह शांतता समितीचे सदस्य, नागरिक, गणेश मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्हा पोलीस अधीक्षक कुमावत यांनी गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येइल. यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. उत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची नागरिकांनी दक्षता घ्यावी. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच कोणत्याही प्रकारच्या अफवा पसरवू नयेत, असे आवाहन त्यांनी केले. महानगरपालिका आयुक्त नार्वेकर यांनी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्यावतीने आवश्यक त्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे सांगितले. गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करून उत्सव शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करावा, असेही त्यांनी आवाहन केले.बैठकीत शांतता समितीचे सदस्य व नागरिकांनी गणेशोत्सवाच्या आयोजनासंदर्भात विविध सूचना मांडल्या. प्रशासनाने या सूचनांची दखल घेत उत्सवाच्या काळात आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

---------------------------------

मागणीनुसार तात्काळ टँकर सुरु करावेत, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे यासह दुष्काळ सवलती लागू करून दुष्काळग्रस्तांना मदत देणे बाबत त्वरीत उपाययोजना करत कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशा मागण्या त्यांनी यावेळी केल्या.

-------------

करण भगवान साबळे याने तक्रारदाराच्या अंगावर धावून येत मारहाण केल्याचे तसेच इतरांनी शिवीगाळ केल्याचे तक्रारदाराने पोलिसांना सांगितले आहे.यावेळी तक्रारदाराला जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे शेतजमिनीच्या हद्दीचा वाद अधिक चिघळल्याचे दिसून येत असून परिसरात चर्चेला उधाण आले आहे.चौघांविरुद्ध NCR दाखलया प्रकरणी तक्रारदाराच्या तक्रारीवरुन1) करण भगवान साबळे2) भगवान दगडू साबळे3) शाम भगवान साबळे4) ज्ञानेश्वर भगवान साबळेसर्व रा. पिंपरखेड, ता. वडवणी, जि. बीड, यांच्याविरुद्ध अदखलपात्र अहवाल नोंदविण्यात आला आहे.या प्रकरणात भारतीय न्याय संहिता (BNS), 2023 मधील कलम 115(2), 352, 351(2) आणि 3(5) अंतर्गत नोंद करण्यात आली आहे.न्यायालयात दाद मागण्याचा सल्ला

सदर नोंद NCR अर्थात अदखलपात्र गुन्ह्याची माहिती अहवाल असल्याने संबंधित तक्रारदारास न्यायालयात दाद मागण्याबाबत समज देण्यात आल्याचे अहवालावरुन दिसून येते. पोलिस अधिकाऱ्यांनी तक्रारदाराचा जबाब नोंदवून अहवालाची नोंद केली आहे.

दरम्यान, शेतजमिनीच्या मोजणीच्या ठिकाणी झालेल्या या वादामुळे पिंपरखेड परिसरात चर्चेला उधाण आले असून, जमिनीच्या हद्दीचा वाद कायदेशीर पद्धतीने निकाली निघणे गरजेचे आहे.

-------------------------------------

रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला नागरिक व समाजबांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.धार्मिक श्रद्धेसोबतच समाजसेवेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.समाजबांधवांची मोठी उपस्थितीसंत सेना महाराज पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्ताने नाभिक समाजबांधवांसह नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, महाप्रसाद आणि रक्तदान शिबिराच्या माध्यमातून भक्ती, समाजएकता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत हा पुण्यतिथी उत्सव उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समस्त नाभिक समाज, परळी वैजनाथ तसेच आयोजकांनी परिश्रम घेतले. युवा प्रदेश अध्यक्ष सुरेंद्रभैय्या कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्सव यशस्वीपणे पार पडला.

--------------------------------

सप्ताहाच्या सातही दिवस विविध महाराजांची कीर्तन सेवा संपन्न झाली. यासोबतच श्रीमद् भागवत कथाही भक्तिभावाने पार पडली. सप्ताहाच्या सांगता सोहळ्यास भाविकांची मोठी गर्दी झाली होती. नामस्मरण, भजन, कीर्तन आणि धार्मिक वातावरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.घागरवाडा गावातील गोपाळ बाबा देवस्थान येथे वर्षभर प्रत्येक गुरुवारी रामायण कथा आयोजित केली जाते. त्यामुळे गावात सातत्याने धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरण पाहायला मिळते. बालाघाटच्या डोंगररांगेत वसलेल्या या गावाला धार्मिक परंपरेची समृद्ध पार्श्वभूमी लाभली आहे.

-----------------------------------

शैक्षणिक तसेच कला व क्रीडा क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, या भावनेतून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये ते सातत्याने सक्रिय सहभाग घेत असतात. विशेषतः सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची परिसरात दखल घेतली जाते. मागील वर्षी वसंतराव नाईक जयंतीचे उत्कृष्ट नियोजन करून त्यांनी कार्यक्रमाला वेगळी ओळख निर्माण करून दिली होती. दरम्यान, प्रा. आकाश राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून आणि मोबाईल, एसएमएस, व्हॉट्सॲप आदी माध्यमांतून शुभेच्छा दिल्या. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत होता. “बार बार दिन ये आये, बार बार दिल ये गाये, तू जिये हजारों साल...” या शुभेच्छांसह आकाश राठोड यांना वाढदिवसाच्या अगणित शुभेच्छा देण्यात आल्या. आयुष्यातील प्रत्येक क्षण आठवणीत राहतोच असे नाही; मात्र काही क्षण असे असतात की ते विसरु म्हणताही विसरता येत नाहीत. वाढदिवसाचा हा आनंदाचा क्षण त्यांच्या आयुष्यात कायमस्वरुपी आठवणीत राहो आणि त्यांच्या सामाजिक कार्याला अधिक बळ मिळो, अशा सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या. यावेळी प्रेमदास पवार, केदारी ढाकणे, वैजवाडी ग्रामपंचायत सदस्य माणिकराव सानप, धारावती ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार, पत्रकार महादेव शिंदे, मलकापूर येथील पत्रकार महादेव गित्ते, वैजनाथ पवार, अर्जुन राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देणाऱ्या सर्व मान्यवरांचे प्रा. आकाश राठोड यांनी आभार मानले.

-----------------------------------

तातडीने भरण्यात यावीत अशीही मागणी केली.राणीसावरगाव परिसराच्या आजूबाजूला अनेक खेडी, वाड्या आणि तांडे आहेत.या भागातील नागरिकांना उपचारासाठी दूरवर जावे लागू नये,आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार मिळावेत आणि नागरिकांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात,यासाठी राणीसावरगावप्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे सय्यद अल्ताफ यांनी बैठकीत स्पष्ट केले.सय्यद यांच्या मागणीची दखल घेत राणीसावरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळण्यासाठी प्रस्ताव व ठराव बैठकीत मंजूर करण्यात आला.त्यामुळे राणीसावरगावसह परिसरातील खेडी, वाड्या आणि तांड्यांतील नागरिकांसाठी हा महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक निर्णय ठरला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधांसाठी शहरांकडे धाव घ्यावी लागू नये,उपचारासाठी होणारी गैरसोय कमी व्हावी आणि प्रत्येक नागरिकाला वेळेवर आरोग्य सेवा मिळावी,या उद्देशाने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.या बैठकीस उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर,तहसीलदार उषाकिरण श्रृंगारे,तहसीलदार माधव बोथीकर,तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे,तालुका आरोग्य अधिकारी मनोजकुमार दीक्षित,तालुका आरोग्य अधिकारी बोराळकर,तालुका आरोग्य अधिकारी पाटील यांच्यासह समितीतील सर्व सदस्य,आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

-------------------------------------

सचिवालयाकडून ई-मेलद्वारे कळवण्यात आली आहे.याबाबत माहिती देताना अनिल बोर्डे म्हणाले, “बीड जिल्हा हा नियोजनाच्या सर्वच बाबतीत मागासलेला आहे. स्वातंत्र्य मिळून 78 वर्षे झाली तरी बीड जिल्ह्याचा अनुशेष भरून निघालेला नाही. त्यामुळे विशेष बाब म्हणून आर्थिक पॅकेज मंजूर करून योग्य ती कारवाई होणे आवश्यक आहे. त्याशिवाय बीड जिल्ह्याचा विकास होणार नाही.”तसेच या निवेदनावर योग्य कारवाई होऊन उत्तर प्राप्त न झाल्यास, याचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी या पत्रकान्वये म्हटले आहे. या मागणीसाठी अनिल बोर्डे गेल्या अनेक वर्षांपासून विविध विषयावर शासन दरबारी पाठपुरावा करत असून, मुख्यमंत्री सचिवालयाने दखल घेतल्याने बीडकरांमध्ये आशा निर्माण झाली आहे.

-------------------------------------

कु. मानसी अलाट हिने सर्वतृतीय क्रमांक प्राप्त केला तर इन्स्टॉलेशन या कलाप्रकारात कु. स्नेहा हमीने कु .साक्षी देशमुख व कु .संचिता आरसूळ यांच्या संघाने सर्वद्वितीय पारितोषिक प्राप्त करून महाविद्यालयाच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे. बीड जिल्ह्यातील 64 महाविद्यालये व एकूण 566 कलावंतांचा भरगच्च सहभाग असणाऱ्या बीड जिल्ह्याच्या युवा महोत्सवात महिला महाविद्यालयाला मिळालेले यश हे खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. यासोबतच भारतीय शास्त्रीय गायन व सुगम गायन स्पर्धेत प्रीती सराफ , वादविवाद स्पर्धेत पायल खेत्रे , संध्या सातपुते प्रश्नमंजूषा स्पर्धेत स्नेहा हमिने , मयूरी रत्नपारखी , राजनंदिनी गित्ते , चित्रकला व पोस्टर स्पर्धेत संचिता आरसुळ तर रांगोळी स्पर्धेत साक्षी देशमुख या सर्वच सहभागी विद्यार्थिनींनी सांस्कृतिक विभागाच्या सर्वच प्राध्यापक वृंदांच्या मार्गदर्शनाने उत्कृष्ट कामगिरी केली .या त्यांच्याबद्दल कै. ल.दे. शि. प्र. मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मा. अनिलराव देशमुख ,संस्थेचे अध्यक्ष मा. संजय देशमुख , संस्थेचे सचिव मा.रवींद्र देशमुख , संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे यांनी त्यांच्यावर भरभरून कौतुकांचा वर्षाव केला .सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अरुण चव्हाण तसेच प्रा. सिद्धेश्वर कोकाट डॉ .पंढरी गुट्टे डॉ. संगीता कचरे डॉ. विद्या गुळभिले आदी सांस्कृतिक विभागातील सर्वच प्राध्यापकांचेही त्यांच्या प्रयत्नाबद्दल अभिनंदन केले . यासोबतच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यांच्या या घवघवीत यशाबद्दल या विद्यार्थिनींचे मनस्वी अभिनंदन केले.

-------------------------------------

परळी
# हॅलो बीड संघर्षनेता
गुरुवार दि. 10 सप्टेंबर 2026
बीड जिल्ह्यातील एकमेव विश्वासाई बातम्यांचे दैनिक
परळी संघर्षनेता


## मराठा आरक्षणासाठी वडवणीत रस्ता रोको आंदोलन; सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी

### तहसीलदारांना निवेदन; शेषेराव जगताप, संतोष डावकर यांच्यासह आंदोलकांचा सहभाग



वडवणी, दि. 9 (प्रतिनिधी) : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी मध्ये मनोज जरांगे पोषण सुरु आहे आज उपोषणाचा अकरावा दिवस आहे त्यात अनुषंगाने वडवणी शहरात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घ्यावा, या मागणीसाठी आंदोलकांनी रस्त्यावर उतरुन जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी सरकारचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.

आंदोलनादरम्यान मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा देत विविध घोषणा देण्यात आल्या. आरक्षणाच्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. काही काळ रस्ता रोको झाल्याने वाहतुकीवर परिणाम झाला.

यानंतर नगराध्यक्ष शेषेराव जगताप, संतोष डावकर, महादेव जमाले, शिवाजी तौर, बजरंग साबळे, सोमनाथ मस्के आणि भैया शेळके यांनी तहसीलदार यांची भेट घेऊन मराठा आरक्षणासंदर्भातील मागण्यांचे निवेदन सादर केले.

मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित असून, समाजाच्या भावना लक्षात घेऊन शासनाने ठोस व कायमस्वरुपी पान 3 वर

## पद्मावती गल्लीतील संभाजीनगरात भक्तीचा जागर; श्री हनुमान मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा ; 'जय श्रीराम'चा जयघोष

### ➡ जीर्णोद्धारानंतर नूतन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा; यज्ञाच्या पूर्णाहुतीवेळी पर्जन्यवृष्टीसाठी सामूहिक प्रार्थना



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- पद्मावती विभागातील छत्रपती संभाजीनगर परिसरातील श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार करून नूतन श्री हनुमान मूर्तीची प्राणप्रतिष्ठा धार्मिक व भक्तिमय वातावरणात करण्यात आली. यानिमित्त आयोजित त्रिदिवसीय धार्मिक सोहळ्यात विविध धार्मिक विधी, यज्ञ व अभिषेक पार पडले. यज्ञाच्या पूर्णाहुतीप्रसंगी मंत्रोच्चारांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार करून नूतन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा धार्मिक वातावरणात करण्यात आली. यानिमित्त आयोजित त्रिदिवसीय धार्मिक सोहळ्यात यज्ञ, पूजा व अभिषेक विधी पार पडले. यज्ञाच्या पूर्णाहुतीप्रसंगी भाविकांनी श्री हनुमानाचे दर्शन घेऊन समाधानकारक पर्जन्यवृष्टी व्हावी व शेतकरी बांधवांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली. या पवित्र प्रसंगी उपस्थित भाविकांनी श्री हनुमानाचे दर्शन घेऊन अभिषेक केला. परळी नगरीसह परिसरावर श्री हनुमानाची कृपादृष्टी राहावी, यंदा समाधानकारक पर्जन्यवृष्टी होऊन पान 3 वर

## पीक जळाले, चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर; बैलपोळ्यापूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने मदत जमा करा

### सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांची सरकारकडे मागणी

**बैलपोळा उद्या... शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू!**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाड्यात यंदा शेतीपिकांची परिस्थिती अत्यंत भयावह बनली असून, निसर्गाच्या अवकृपेमुळे बळीराजा अक्षरशः संकटाच्या खाईत लोटला गेला आहे. उद्या, 10 सप्टेंबर रोजी शेतकऱ्यांचा सर्वात मोठा सण बैलपोळा साजरा होत असताना शेतकऱ्यांच्या हातात पैसा नाही, शेतात पीक नाही आणि दावणीला बांधलेल्या मुक्या जनावरांसाठी चारा-पाण्याचीही तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत सरकारने पंचनाम्यांच्या कागदी घोड्यांमध्ये



वेळ न घालवता तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत पान 3 वर

## गणेशोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करावा - जिल्हाधिकारी

### -परभणीत जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक




प्रतिनिधी :- अनंत कोरे गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि सामाजिक सलोखा जपत साजरा करावा. गणेश मंडळांनी उत्सवाच्या माध्यमातून जनजागृतीपर व समाजोपयोगी उपक्रम राबवून आदर्श निर्माण करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले. ते बुधवारी(दि. 9) जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठकीत बोलत होते.

या बैठकीस पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, महापौर सय्यद इकबाल, पान 3 वर

## आ. प्रकाश सोळुंके यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



बीड, 09 सप्टेंबर । विविध मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आमदार प्रकाश सोळुंके यांनी भेट घेतली.

मराठवाडा विभागात विशेषत: बीड जिल्ह्यात यावर्षी पावसाचे अत्यल्प व अनियमित प्रमाणात पावसातील दिर्घ खंड, जलसाठ्यांमध्ये झालेली घट यासह आदी कारणांमुळे गंभीर दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.त्याचा सर्वाधिक फटका शेतकरी, शेतमजुर, पशुपालक आणि ग्रामीण भागातील नागरीकांना बसत आहे.त्या अनुषंगाने सध्याच्या परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन खरीप पिके, फळबागा व ऊसासह नगदी पिकांचा पंचनामे करून पिक विमा कंपन्यांना नुकसान भरपाई अदा करण्याचे निर्देश द्यावेत, पान 3 वर

## मोजणीच्या ठिकाणी शेतजमिनीवरून वाद; चौघांविरुद्ध मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार

वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथे शेतजमिनीच्या मोजणीवरून वाद निर्माण झाल्याची घटना 8 सप्टेंबर 2026 रोजी घडली. याप्रकरणी सुनील परमेश्वर घाटूळ यांनी वडवणी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन चौघांविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या NCR क्रमांक 0304/2026 नुसार, तक्रारदार सुनील परमेश्वर घाटूळ हे वय 31 वर्षे असून शेती व्यवसाय करतात व पिंपरखेड येथे राहतात. तक्रारीनुसार त्यांची पिंपरखेड येथे शेती असून या शेतीच्या वहितीमध्ये काही वर्षांपासून अडथळा निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

शेतजमिनीची मोजणी करण्यासाठी तारीख

शेतीच्या हद्दीबाबतचा वाद दूर करण्यासाठी तक्रारदाराने भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी 8 सप्टेंबर रोजी मोजणीची तारीख देण्यात आली होती. त्यानुसार तक्रारदार मोजणीच्या ठिकाणी गेले असता तेथे गावातील संबंधित व्यक्ती आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

'ही जागा आमची आहे, तुम्ही येथे येऊ नका' असा दम

तक्रारीनुसार, मोजणीच्या ठिकाणी भगवान दगडू साबळे यांनी जागेबाबत आक्षेप घेतला. 'ही जागा आमची आहे, तुम्ही येथे येऊ नका,' असे म्हणत वाद घातल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यानंतर पान 3 वर

## संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव उत्साहात संपन्न

### भक्तिमय वातावरणात कीर्तन, ग्रंथ दिंडी व महाप्रसाद; रक्तदान शिबिरालाही उत्स्फूर्त प्रतिसाद



परळी वैजनाथ/ प्रतिनिधी :

संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त समस्त नाभिक समाज, परळी वैजनाथ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला श्री संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव 2026 विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. समता नगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व श्री संत सेना महाराज मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

उत्सवानिमित्त सकाळी महाराष्ट्र अभिषेक, ग्रंथपूजा व ग्रंथ दिंडी आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले. त्यानंतर भागवताचार्य ह.भ.प. बाळासाहेब महाराज लटपटे कोठीकर यांच्या रसाळ कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. संत सेना महाराजांचे विचार, भक्ती, समाजसेवा आणि सामाजिक एकतेचा संदेश कीर्तनातून देण्यात आला.

कीर्तनानंतर आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. यावेळी मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

या उत्सवाला आ.धनंजय पंडितराव मुंडे तसेच परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांची नेते पप्पुसेठ ठक्कर शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष), नगरसेवक जयपाल सेठ लाहोटी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

संत सेना महाराजांच्या विचारांचा सामाजिक संदेश पुढे नेत उत्सवानिमित्त सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत पान 3 वर

## घागरवाडा अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता संपन्न

### 13 व्या वर्षीही भक्तिमय वातावरणात सप्ताहाचा समारोप



किल्ले धारुर ( पत्रकार बाबुराव तिडके)घागरवाडा : किल्ले धारुर तालुक्यातील घागरवाडा येथे दर वर्षा प्रमाणे याही वर्षी गेल्या तेरा वर्षांपासून सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता बुधवार, दि. 9 सप्टेंबर 2026 रोजी चोंडी येथील चंद्रशेखर बाबा मठ संस्थानचे मठाधिपती अप्पा महाराज चौरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली.

घागरवाडा येथील गोपाळ बाबा देवस्थानच्या पावन भूमीत तसेच श्री हनुमान मंदिरासमोर आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहाला परिसरातील भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. पान 3 वर

## शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या प्रा. आकाश राठोड ; प्रेमदास पवार यांच्या हस्ते वाढदिवसानिमित्त सत्कार



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- प्राथमिक आश्रम शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक कौडगाव हुडा या शाळेचे सचिव तथा सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणारे प्रा. आकाश दत्तात्रय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. ऊसतोड कामगार महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष प्रेमदास पवार यांच्या हस्ते प्रा. आकाश राठोड यांना पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रा. आकाश दत्तात्रय राठोड हे आपल्या मवाळ व मनमिळाऊ स्वभावामुळे तसेच प्रत्येकाच्या मदतीला तत्परतेने धावून जाणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. सामाजिक, राजकीय, पान 3 वर

## राणीसावरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देणारा ठराव मंजूर सय्यद अल्ताफ यांच्या मागणीला यश




प्रतिनिधी :अनंत कोरे राणीसावरगाव शहरातील उपविभागीय कार्यालयाच्या नवीन सभागृहात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एकात्मिक आरोग्य वर्धिनी समितीची आढावा बैठक आ.डॉ.रत्नाकरराव गुट्टे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या बैठकीत गंगाखेड,पालम,पूर्णा या तिन्ही तालुक्यांतील आरोग्य व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत आरोग्य सुविधा मिळाव्यात,यासाठी आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमधील अडचणी,मनुष्यबळ,वैद्यकीय सुविधा,औषधसाठा,रुग्णवाहिका तसेच मूलभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान राणीसावरगाव गटाचे जिल्हा परिषद सदस्य सय्यद अल्ताफ यांनी राणीसावरगाव व परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ठामपणे मांडत राणीसावरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळावा अशी मागणी केली.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे पान 3 वर




## विशेष बाब म्हणून बीड जिल्ह्याला आर्थिक पॅकेज मंजूर करून अनुशेष भरून काढावा

### ● अनिल बोर्डे यांच्या निवेदनाची मुख्यमंत्री सचिवालयाने घेतली दखल

गेवराई (प्रतिनिधी) -* विशेष बाब म्हणून बीड जिल्ह्याला आर्थिक पॅकेज मंजूर करून अनुशेष भरून काढण्याबाबत श्री अध्यक्ष जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई व मराठवाडा विकास आंदोलनाचे समन्वयक अनिल बोर्डे यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन



यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती.

या निवेदनाची दखल *मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई* यांनी घेतली असून, सदरील निवेदन योग्य त्या कार्यवाहीसाठी *नियोजन विभाग (022-22029496) व वित्त विभाग (022-22029721)* यांच्याकडे सादर करण्यात आले आहे, अशी माहिती पान 3

## डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवामहोत्सवात महिला महाविद्यालयाचे सुयश



परळी वार्ताहर , दि 4 व 5 जुलै 2026 या काळात पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय , सिरसाळा जि . बीड . इथे झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाने नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे .येथील महिला महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न करत असते .अभ्यासासोबतच सांस्कृतिक कार्यात व विविध कला प्रकारातही या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी सदैव अग्रेसर असतात . त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाने आयोजित बीड जिल्हा युवा महोत्सवात झालेल्या मिमिक्री या कलाप्रकारात पान 3 वर